दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र | शुक्रवार दि.२२ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -८९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## माझ्याकडे १ पैसाही सापडला नाही

**मुंबई (वृत्तसंस्था)**–भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी बुधवारी नालासोपारा येथे घडलेल्या घटनेमागे कोणतेही कट कारस्थान नसल्याचा दावा केला आहे. काल मी नालासोपारा येथे जाणार असल्याची माहिती भाजपच्या कोणत्याही नेत्याला नव्हती. मी अचानक तिथे गेलो होतो. त्यामुळे त्या घटनेमागे काही कारस्थान असल्याचा आरोप चुकीचा आहे, असे त्यांनी म्हटले आहे.विनोद तावडे यांना मंगळवारी विरार पूर्वच्या मनोरीपाडा येथील विवांत हॉटेलमध्ये कथितपणे पैसे वाटताना पकडण्यात आले होते. त्यानंतर खासदार संजय राऊत यांच्यासह अन्य विरोधी पक्षांच्या नेत्यांनी ही घटना भाजपच्याच अंतर्गत राजकारणातून घडल्याचा दावा केला होता. तसेच या प्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला होता. या पार्श्वभूमीवर विनोद तावडे यांनी बुधवारी आपला मताधिकार बजावल्यानंतर आपली बाजू स्पष्ट केली.विनोद तावडे म्हणाले, मी नालासोपारा इथे जाणार हे भाजपमधील कोणत्याच नेत्याला ठावूक नव्हते. कारण, वाड्याहून परत येताना मी उमेदवार राजन नाईक यांना फोन केला. त्यांच्याकडून मतदारसंघातील स्थितीची माहिती घेतली.

### विनोद तावडे दोषी नाहीत–देवेंद्र फडणवीस

# देशमुखांवरील हल्ला म्हणजे चित्रपटातील सलीम-जावेदची स्टोरी असल्याची टीका

**नागपूर (वृत्तसंस्था)**–विनोद तावडे यांनी कोणतेही पैसे वाटले नाहीत. त्यांच्यावर जाणून-बुजून आरोप लावण्यात आले आहेत. विनोद दोषी नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. निवडणुकीत पराभव दिसू लागल्याने असे आरोप होत असल्याचे फडणवीस म्हणाले. तसेच अनिल देशमुखांवरील हल्ला म्हणजे सलीम-जावेदची स्टोरी आहे. मागून मारलेला दगड पुढे कसा लागला, असा सवालही देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. ते नागपुरात माध्यमांशी बोलत होते.

निवडणुकीत पराभव दिसायला लागल्यावर आरोप होतात. त्यातलाच हा प्रकार आहे. विनोद तावडे केवळ कार्यकर्त्यांना भेटायला गेले होते. कुठलाही पैसा, आक्षेपार्ह गोष्टी त्यांच्याजवळ सापडलेल्या नाहीत. उलट विनोद तावडे आणि नालासोपाराचे उमेदवार राजन नाईक यांच्यावर हल्ला झाला आहे. उद्याचा दिसणारा पराभव कव्हर करण्यासाठी महाविकास आघाडीच्या एकोसिस्टमने कव्हर फायरिंग केले आहे, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली. विनोद तावडे या प्रकरणात दोषी नाहीत. त्यांनी कुठलेही पैसे नेले नाही, वाटले नाहीत. त्यांच्यावर जाणून-बुजून आरोप करण्यात आले आहेत, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

१० किलोचा गोटा काचेच्या खिडकीवर मारला, तर ती खिडकी तुटली का नाही? १० किलोचा गोटा पडल्यानंतर बोनेटला साधी स्क्रॅच देखील का आली नाही? असे प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केले आहे. एकच गोटा गाडीत दिसला असून तो गोटा कारच्या मागील बाजुने मारलेला आहे. मागील बाजुने दगड मारला, तर तो मागे लागायला पाहिजे. तो समोर कसा लागला? मागून फेकलेला दगड गोल फिरून समोरुन लागणे, अशाप्रकारचा दगड फक्त रंजनीकांतच्या चित्रपटात फेकला जाऊ शकतो, असा टोला फडणवीसांनी लगावला. एक किलोचा दगड लागल्यानंतर केवळ टाके पडले आहेत. त्यात कोणतेही मोठी जखम दिसत नाही. निवडणुकीत मुलाचा पराभव दिसू लागल्याने हा सर्व प्रकार घडवण्यात आला आहे. भाजपला बदनाम करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशाप्रकारच्या स्टोरीला काल पवार साहेबांसह सर्वांनी जाणीवपूर्वक इकोसिस्टम उपलब्ध करून दिली, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला.

दरम्यान, विनोद तावडे यांच्या पुढाकाराने डहाणू येथील बविआच्या उमेदवारानेच थेट भाजपात प्रवेश केला. त्याच रागात हितेंद्र ठाकूर आणि क्षितिज ठाकुर बापलेकांनी विनोद तावडेंना बदनाम करायला पैसे वाटपाचे आरोप करून बदनाम केले, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. विनोद तावडे यांच्याकडे पैसे सापडले नसल्याचेही एकनाथ शिंदे म्हणाले.



# चुरशीच्या सामान्यात गुरु जिंकणार कि शिष्य ?

**केज | प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी संपली वेगवेगळ्या संस्थांनी आपआपले पोल जाहिर केले . कोणी महाविकास आघाडी तर कोणी महायुती मात्र खराखुरा जनतेचा पोल हा २३ नोव्हेंबरलाच जाहीर होणार आहे. तसे पाहीले तर बहुतांश पोल हे सपशेल नापास झालेले असल्याचे या अगोदरच्या निवडणुकीत महाराष्ट्राने वा देशाने पाहिले आहेत.

तसे पाहिले तर महाराष्ट्रामध्ये विधानसभेची निवडणुक जागोजागी चुरशीची झाल्याचे दिसून येते त्यामध्ये बीड संवेदनशील असणारा बीड जिल्हा कसा सुटेल बीड, गेवराई ,माजलगाव ,आष्टी , परळी आणि केज अगदी चुरशीचे लढती या ठिकाणी पहायला मिळाल्या त्यामध्ये केज विधानसभा हा मतदारसंघ



अनुसुचीत जाती करीता राखीव असणारा तसेच एकेकाळी स्व. विमलताई मुंदडा यांचे वर्चस्व असणारा मतदार संघ स्व. विमलताई मुंदडा यांनी केज- अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघात काम करत असताना विविध जातीचे अनेक नेते तयार केले. नव्हे तर त्या आजच्या नेत्यांच्या गुरुच म्हणाव्या लागतील त्यांच्या निधनानंतर नंदकिशोर मंदडा व त्यांचा मुलगा अक्षय मुंदडानवर हि जिम्मेदारी आली आणि त्यांच्याच तालमीत तयार झालेले पृथ्वीराज साठे हे आमदार झाले. मात्र यांचेही जास्त दिवस न जमल्यामुळे यांनी मुंदडा घरण्याची फारकत घेतली. आज २०२४ केज विधानसभा मतदार संघात मुंदडा विरुद्ध साठे म्हणजेच गुरु विरुद्ध शिष्य असा सामना पहावयास मिळाला. या निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागणार आहे मात्र या लढतीत गुरु बाजी मारणार की शिष्य हे पाहणे गरजेचे आहे. जर गुरुने बाजी मारली तर समजून जायचे कि गुरु हाचा राखुन होता आणि जर शिष्यांने बाजी मारली तर समजायचे शिष्य गुरूपेक्षा चपळ होता.

# मतदानाचा टक्का वाढावा या उद्देशाने पळसगाव येथील बुथवर आकर्षक वृक्षांची सजावट

**नायगाव | हनुमंत चंदनकर**

पळसगाव तालुका नायगाव या ठिकाणी कृषी विभाग नायगाव यांच्या संकल्पनेतून मतदार राजा आपल्या पवित्र मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आकर्षित होण्यासाठीचा उद्देश लक्षात घेऊन येथे विविध शोच्या वृक्षांने बुतला सजावट करण्यात आली आहे, आणि यासाठी इथे अधिकाधिक आकर्षक व फुलांची सजावट, रांगोळी काढून स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आली असल्याची माहीती पळसगाव येथील पोलीस पाटील संतोष सूर्यवंशी यांनी दिली आहे.

महाराष्ट्र विधानसभा आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काल दिनांक २०/११/२०२४ मतदान प्रक्रिया पार पडली लोकशाहीच्या महाउत्सवात बहुमुल्य वेळ काढून मतदानाचा अनमोल हक्क बजावावा सुदृढ लोकशाहीसाठी योगदान द्यावे या




उद्देशाने मतदार राजा आकर्षक होण्यासाठीचा हा एक संकल्प होता असे त्यांनी सांगितले यासाठी द गार्डन गॅलरी चे मालक धोंडीराम सुपारे टाकळगावकर यांनी सहकार्य केले आहे.

मतदान करताना कुठलीही अडचण येवू नये, याची दक्षाता घेण्यात आली होती. केंद्रावर वयोवृद्ध, दिव्यांगांना बसण्याची सोय करण्यात आली होती. मतदान केंद्रांवर निवडणूक विभागाचे कर्मचारी यांचे बैठे पथक असल्याने आलेली अडचन तातडीने सोडवण्यासाठी नियोजनबद्ध यंत्रणा उभारल्याने मतदारांना मतदान करताना कुठलीही अडचण आल्याच्या तक्रारी आल्या नाहीत.

पळसगाव येथे ८३.४६% मतदान झाले आहे.एकूण मतदान ८८९ पैकी ३६८ महिला व ३७४ पुरुष असे एकूण ७४२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे आणि आपल्या उज्वल भविष्यासाठी देशाच्या विकासासाठी आपलं अनमोल मतदान देऊन देश हितासाठी मतदान केले आहेत.

# लोकसभेप्रमाणे विधानसभेतही बीड़ रहिवासी व पुणे निवासी मतदारांचा जिल्ह्यातील उमेदवारांना विसर-श्याम पिंपळे

### लोकसभे प्रमाणे पाच सात हजारांनी उमेदवार पडले तर पुणे तील मतदाराची आठवण होईल

**पुणे | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील उपजीविकेसाठी पुणे जिल्ह्यामध्ये ६० ते ७० हजार परिवार स्थायिक झाले असून हे सर्व विस्थापित नावे आपापल्या मतदार संघातील यादीमध्ये समाविष्ट आहे. लोकसभेमध्ये या मतदारापर्यंत न पोचल्यामुळे पंकजाताई मुंडे यांना पराभव पत्करावा लागला होता. तशीच परिस्थिती विधानसभेत ही निर्माण झाली असून जर बीड जिल्ह्यातील एखादा उमेदवार दोन पाच हजार मतांनी पडला तर त्या उमेदवारांना कदाचित पुण्यात विस्थापित झालेल्या मतदारांची आठवण होईल असे वाटते.. मागील विधानसभा निवडणुकीत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भोसरी येथे बीड जिल्ह्यातील पुणे जिल्ह्यात राहत असलेल्या सर्व मतदारांचा २० ते २५ हजाराचा मेळावा घेतला होता. आणि त्यांना मतदानाला नेण्याची व्यवस्था देखील केली होती. पण मागील लोकसभा निवडणुकीत आणि आत्ताच्या विधानसभा निवडणुकीत असे दिसून येत नसून याचा फटका कोणत्या उमेदवाराला



बसेल हे सांगता येत नाही पण बसणार नक्की एवढे खरे.. उपजीविकेसाठी पुणे जिल्ह्यात बीड जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर परिवार गेला असून आपापल्या परीने ते नोकरीत किंवा व्यवसायात सक्षम झाले आहेत. तरीपण बीड जिल्ह्याची भूमिपुत्र म्हणून ते आपल्या तालुक्याला गावाला आणि वार्डाला विसरले नाहीत. पण निवडणूकीस उभे असलेले उमेदवार हे नक्कीच या भूमिपुत्राला विसरले आहेत याची खंत आहे.अशा भावना भारतीय जवान किसान पार्टीचे प्रसिद्धीप्रमुख श्याम पिंपळे यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे व्यक्त केले आहेत.

## राज्यातील जिल्हा निहाय मतदानाची टक्केवारी

| | |
|---|---|
| अहमदनगर-६१.९५ टक्के | नागपूर -५६.०६ टक्के |
| अकोला - ५६.१६ टक्के | नांदेड -५५.८८ टक्के |
| अमरावती - ५८.४८ टक्के | नंदुरबार -६३.७२ टक्के |
| औरगाबाद -६०.८३ टक्के | नाशिक -५९.८५ टक्के |
| बीड -६०.६२ टक्के | उस्मानाबाद -५८.५९ टक्के |
| भंडारा -६५.८८ टक्के | पालघर -५९.३१ टक्के |
| बुलढाणा -६२.८४ टक्के | परभणी - ६२.७३ टक्के |
| चंद्रपूर -६४.४८ टक्के | पुणे -५४.०९ टक्के |
| धुळे- ५९.७५ टक्के | रायगड - ६१.०१ टक्के |
| गडचिरोली - ६९.६३ टक्के | रत्नागिरी -६०.३५ टक्के |
| गोंदिया - ६५.०९ टक्के | सांगली -६३.२८ टक्के |
| हिंगोली - ६१.१८ टक्के | सातारा -६४.१६ टक्के |
| जलगाव - ५४.६९ टक्के | सिंधुदुर्ग -६२.०६ टक्के |
| जालना -६४.१७ टक्के | सोलापूर -५७.०९ टक्के |
| कोल्हापूर -६७.९७ टक्के | ठाणे -४९.७६ टक्के |
| लातूर -६१.४३ टक्के | वर्धा -६३.५० टक्के |
| मुंबई शहर -४९.०७ टक्के | वाशिम -५७.४२ टक्के |
| मुंबई उपनगर - ५१.७६ टक्के | यवतमाळ -६१.२२ टक्के |

### बौद्ध धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन-बालासाहेब जगतकर

# तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साप्ताहिक मानपत्र च्या वतीने आयोजन

**परळी | प्रतिनिधी**

तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साप्ताहिक मानपत्र परळीच्या वतीने २३ फेब्रुवारी २०२५ रोजी बौद्ध धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख साप्ताहिक मानपत्र चे संपादक तथा तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब जगतकर यांनी दिली आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहर व तालुक्यातील सर्व बौद्ध बांधवांना कळविण्यात येते की तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साप्ताहिक मानपत्र परळीच्या वतीने दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी रविवारी दुपारी ठीक दीड वाजता परळी शहरातील नटराज रंगमंदिर येथे बौद्ध धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बौद्ध समाजातील लोकांचा अनाठायी खर्च होणे व त्यासाठी कर्जबाजारी होणे व त्यामुळे आर्थिक समस्येच्या खाईत लोटले जाणे हे प्रकार टाळण्यासाठी व समाजातील ज्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे अशा कुटुंबातील नववधू वरांना या सामूहिक विवाह सोहळ्यात भाग घेता यावा व सर्व समाजातील लोक एकत्र यावे हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून समाजातील जास्तीत जास्त नववधूवरांनी व त्यांच्या पालकांनी याचा लाभ घ्यावा व २३ जानेवारी २०२५ पर्यंत नाव नोंदणी करण्यात यावी असे ही आव्हान करण्यात आले असून नाव नोंदणीसाठी रहिवासी प्रमाणपत्र जातीचे प्रमाणपत्र दोन पासपोर्ट फोटो शंभर रुपयांच्या बॉण्ड वर शपथ पत्र टीसी ची झेरॉक्स असे कागदपत्र घेऊन नाव नोंदणी करावी असेही आवाहन करण्यात आले असून यापूर्वी सदरील विवाह हा २६ मे २०२४ रोजी आयोजित करण्यात आला होता परंतु लोकसभेच्या निवडणुकीमुळे व निवडणूक आयोगाच्या निर्देशामुळे सदरील सामूहिक विवाह सोहळा रद्द करण्यात आला होता त्यामुळे हा विवाह २३ फेब्रुवारी२०२५ रोजी ठेवण्यात आलेला आहे. तरी जास्तीत जास्त बौद्ध धर्मियांनी याचा फायदा घ्यावा असेही आव्हान तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष साप्ताहिक मानपत्र चे संपादक व वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी केले आहे.

# केज तालुक्यातील ऊस वाहतूक वाहनांना रेडियम,रिफ्लेक्टर लावा-दिनकर जाधव

### वाहतूक विभागाकडून जागृती आणि कार्यवाहीची आवश्यकता

**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यात दोन साखर कारखाने आहेत. दोन्ही कारखाने सुरु झाले आहे, ऊस उत्पादक शेतकर्यांसाठी आनंदाची गोष्ट आहे. पण रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या बहुतांश वाहनांच्यापाठीमागे रेडियम अथवा रिफ्लेक्टर लावलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कारखाना संचालक यांनी याची सक्ती करुन होणारे अपघात टाळण्याची मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी पत्रकाद्वारे केली आहे.

दिवसेंदिवस रोडवरील अपघातांची संख्या वाढत आहे. वाढती अपघाताची संख्या कमी करण्यासाठी वाहतूक नियमांची जनजागृती तसेच त्यावर विविध उपाययोजना होणे गरजेचे आहे. सद्या साखर कारखाने सुरु झाले आहेत. रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या वाहनांमुळे अनेक अपघात झालेली आहेत. या अपघातामध्ये अनेक निष्पाप बळी गेलेले आहेत. त्यामुळे साखर कारखानदार यांनी






कारखान्यावर येणाऱ्या प्रत्येक ऊस वाहतूक वाहनांच्या मागे रेडियम, रिफ्लेक्टर लावणे सक्तीचे करावे. तसेच वाहतूक विभागाकडून वाहतूक नियमांचे पालन न करणार्या ऊस वाहतूक वाहनांवर कडक कार्यवाही होणे गरजेचे आहे. तसेच ऊस वाहतूक करणार्या वाहन चालकाने वाहतूकीच्या नियमाचे काटेकोटरपणे पालन करुन वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावण्याबाबत वाहन चालक व मालक यांना सुचना देण्यात याव्यात अशी मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी पत्रकाद्वारे केली आहे.

संपादकीय

# हत्तींमधील अनुवंशिक वैविध्य

नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस आणि इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्समधील जीवशास्त्रज्ञांनी भारतातील हत्तींचा काही वर्षे अभ्यास केला. भारताच्या विविध जंगलांतील ३४ हत्तींच्या रक्तनमुन्यांतील जनुकक्रमांचे पृथक्करण त्यांनी केले. पूर्वी वाटायचे तसे भारतीय हत्तींचे जनुकीय दृष्ट्या गट, तीन नसून पाच आहेत, असे त्यातून दिसले.उमा रामकृष्णनसारख्या पर्यावरणशास्त्रज्ञांच्या मते उत्तर भारतातील दोन हत्तीगटांत दक्षिण भारतातल्या तीन हत्तीगटांपेक्षा जास्त जनुकीय फरक आहेत. दक्षिण भारतात पोहोचलेल्या हत्तीसमूहांत तुलनेने संकुचित लोकसंख्येत, अंतर्जननामुळे जनुकीय फरक आणखी घटत गेले असावे. या तर्क–निरीक्षणांवर आधारित शोधनिबंध त्यांनी सप्टेंबर २०२४च्या 'करंट बायोलॉजी' वैज्ञानिक नियतकालिकात प्रकाशित केला आहे. त्यातील निवेदनानुसार आशियातील काही हत्ती भारताच्या उत्तरेकडून सुमारे एक लाख वर्षांपूर्वीपासून हळुहळू भारतात शिरले आणि दक्षिणेकडे प्रवास करू लागले. भारताच्या विविध भागांत ते पसरले आणि वसले. प्राचीन काळापासून झालेल्या हत्तींच्या उत्तरेकडून दक्षिणेकडे झालेल्या स्थलांतरात या महाकाय प्राण्यांची प्रवासात विविध प्रकारे कोंडी झाली असणार. विविध वयोगटांच्या, सगर्भा, वृद्ध, आजारी, शिशु–बाल अवस्थेतील हत्तींसह मोठ्या कळपांना दीर्घ मजल मारणे अवघड जात असणार. मार्गात पाण्याचा, पुरेशा सकस अन्नाचा अभाव, मोठमोठ्या शिळा असणे, जमिनीच्या अतिउतारामुळे जड देह गडगडून जायबंदी होणे, ब्रम्हपुत्रेसारख्या अतिरुंद नद्यांतील जोरदार जलप्रवाहामुळे कळप अडकून राहणे – अशा संकटांमुळे हत्तीसंख्या रोडावत असणार.एखाद्या जातीच्या सजीवांची संख्या घटते तेव्हा त्यांच्या संकुचित लोकसंख्येत अंतर्जनन होत जनुकीय फरक कमी होतात, दोष वाढतात. मोठ्या लोकसंख्येत भरपूर अनुवंशिक जनुकीय विविधता असते. विविधतेमुळे रोगांपासून बचाव, पर्यावरणाशी अनुकूलन अशा वंशसातत्यासाठीच्या क्रिया शक्य होतात. बदललेल्या प्रतिकूल पर्यावरणात लोकसंख्या जगण्याची आणि परिस्थिती सुधारताच संख्यावाढीची थोडीतरी शक्यता असते. मदुरैजवळच्या शेनगोट्टाई खिंडीच्या दक्षिणेला असलेल्या भूभागात फक्त दीडशे हत्ती उरले आहेत. हा समूह ताबडतोब काळजी न घेतल्यास नष्ट होण्याची भीती व्यक्त होत आहे. ताजे संशोधन संवर्धनाच्या दृष्टीने उपाययोजना आखण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

# एसटीच्या घोषणांचा धुरळा




विमानांच्या धर्तीवर एसटी बसमध्ये 'शिवनेरी सुंदरी' नियुक्त करण्याच्या अफलातून कल्पनेपाठोपाठ आता राज्य परिवहन महामंडळाने हॉटेल आणि रिसॉर्ट सुरू करण्याची टूम काढली आहे. आपले मूळ उद्दिष्ट, प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय आणि त्याची अवस्था यांकडे पाठ फिरवून पोतडीतून नवनव्या योजनांची कबुतरे काढण्याचा जणू छंदच नव्या अध्यक्षांना आणि व्यवस्थापनाला जडलेला दिसतो. 'गाव तिथे एसटी'चे ध्येय डोळ्यासमोर ठेवून एसटी महामंडळाने आजवर काम केले. प्रवाशांना सेवा देण्यात त्यांना आजवर आलेले यश–अपयश, त्यामधील त्रुटी हा मुद्दा चर्चेचा आहे; परंतु आपल्या मूळ उद्देशांशी फारकत घेणे योग्य नाही. मात्र, त्याचा विचार न करता नवे अध्यक्ष दररोज नव्या घोषणा करीत आहेत. मुळात मंत्रिपदासाठी इच्छुक असताना एसटीच्या अध्यक्षपदावर बोळवण करण्यात आल्याने भरत गोगावले आधी नाराज होते; पद स्वीकारण्यास त्यांनी टाळाटाळही केली. सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी 'शिवनेरी सुंदरी' नियुक्तीचा निर्णय घेतला. तो कितपत योग्य यावर चर्चा सुरू असतानाच, लोणावळ्यात सात मजली हॉटेल आणि पन्हाळा येथे आलिशान रिसॉर्ट सुरू करण्याचा संकल्प सोडला गेला.

दसऱ्याच्या मुहूर्तावर एसटी महामंडळ आदरातिथ्य व्यवसायात 'सीमोल्लंघन' करणार आहे. 'प्रवाशांच्या सेवेसाठी' असे ब्रीदवाक्य घेऊन राज्यात सुरू झालेली एसटी सेवा ही खेडोपाडीच्या लाखो प्रवाशांचा आधार आहे. त्या सेवेत अधिकाधिक सुधारणा करण्यासाठी पावले उचलणे अपेक्षित आहे. राज्य सरकारने महिलांना निम्म्या दरात आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासासारख्या योजनांमुळे एसटीचे प्रवासीही वाढले आहेत. मात्र, सेवेचा दर्जा सुधारण्याच्या मार्गावर एसटीला अद्याप मोठा पल्ला गाठावयाचा आहे. काही प्रमुख मार्गांवरील शिवनेरी व अन्य बस वगळता बहुसंख्य 'लाल परी' बसच्या दुरवस्थेमुळे प्रवासी हैराण झाले आहेत. चालक–वाहकांची संख्या कमी असल्याने सध्याच्या कर्मचाऱ्यांवर सेवेचा प्रचंड ताण आहे. स्थानकांची अवस्था दयनीय असून उपाहारगृहे व चालक–वाहकांच्या विश्रांती कक्षात डोकावले, तर प्रवासी आणि कर्मचारी काय स्थितीत आहेत, याची कल्पना येईल. वेतन, भत्त्यांची थकबाकी व अन्य मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी नुकताच संप पुकारला होता.आर्थिक अडचणींमुळे महामंडळाला वारंवार राज्य सरकारकडे धाव घ्यावी लागते. अशा स्थितीत मांडण्यात येत असलेल्या या योजनांमुळे एसटीच्या मोक्याच्या जागेवर कोणाचा डोळा आहे का, अशीही शंका घेण्यास मोठा वाव आहे. आता निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होईपर्यंत या घोषणांचा धुरळा उडतच राहणार, असे दिसते.

# चिंताग्रस्त जन्मदात्यांचा गौरव

यंदाचे भौतिकशास्त्राचे नोबेल जॉन हॉपफिल्ड आणि जेफ्री हिंटन यांना जाहीर करण्यात आले आहे. कोणत्याही वैज्ञानिकाला नोबेल मिळणे हा कृतार्थतेचा क्षण वाटतो. हॉपफिल्ड आणि हिंटन यांना अशी सार्थकता वाटते आहे, की चिंतेनेच त्यांचे मनाचा ताबा घेतला आहे? हॉपफिल्ड हे आधीच्या पिढीचे, आत्ता ९१ वर्षांचे असणारे शास्त्रज्ञ; तर हिंटन हे त्यांचे काम पुढे नेणारे आत्ता ७७ वर्षांचे वैज्ञानिक. दोघेही गेले काही दिवस वारंवार त्यांनी केलेल्या विलक्षण वैज्ञानिक कामाच्या भवितव्याबाबत आणि प्रगतीबाबत चिंता व्यक्त करीत आहेत.जे. रॉबर्ट ओपनहायमर याने आपण शोध लावलेल्या अणुबॉम्बचा पुन्हा कधीही वापर होऊ नये, असे म्हटले होते. 'आपल्या हातावर जणू रक्ताचे डाग पडल्यासारखे वाटते आहे,' असेही तो म्हणाला होता. हॉपफिल्ड आणि हिंटन यांची भावना इतक्या टोकाला गेली नसली तरी आपण लावलेल्या शोधांमुळे एखाद्या दिवशी सारी मानवजातच विनाशाच्या गर्तेत जाऊन पडेल की काय, अशी भयशंका त्यांच्याही मनाला ग्रासते आहेच. इतक्या विवेचनावरून लक्षात आले असेल की हे दोन्ही वैज्ञानिक 'आर्टिफिशियल इंटलिजन्स' म्हणजे कृत्रिम प्रज्ञेच्या क्षेत्रात काम करत आहेत. सकल जगाच्या समग्र भवितव्याचा सारांश म्हणजे 'एआय' ही दोन अक्षरे बनली आहेत. 'चॅटजीपीटी'च्या रूपाने आपल्याही सगळ्यांच्या हातात कृत्रिम प्रज्ञेचा आविष्कार येऊन बसला आहे. मात्र, हे एआयचे अत्यंत छोटे रूप आहे. एआय ही चौथी औद्योगिक क्रांती आहे, असे



म्हटले जाते. मात्र, आधीच्या क्रांतीपेक्षा ही अत्यंत कमी काळात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला सखोल स्पर्श करणारी क्रांती आहे.'कृत्रिम प्रज्ञेचे जनक' असा ज्यांचा सार्थ गौरव होतो, त्या जॉन हॉपफिल्ड यांनी 'एआयची सध्याची घोडदौड पाहून कधी कधी माझ्या मनाचा थरकाप उडतो. एआयचा विस्तार वेळीच रोखला नाही किंवा त्याला योग्य ते वळण दिले नाही तर एक दिवस मानव जातीवर भयानक मोठे संकट येऊन आदळेल,' असे म्हटले आहे. हॉपफिल्ड यांच्या मनात कोणकोणते धोके असतील, हे सांगता येत नाही, पण इस्रायलने अलीकडेच एकाचवेळी जे पेजरस्फोट घडवून आणले, त्यात एआयचा वापर झाला आहे का, याचा शोध वैज्ञानिक घेत आहेतच. एआय तंत्रज्ञानाचा झपाटा इतक्या वेगाने वाढतो आहे की मानवी प्रज्ञेला मागे टाकून कृत्रिम प्रज्ञेने आपल्या विकासाची वाट स्वत:च चालायला सुरुवात केली तर काय करायचे? तिला कसलीही नैतिक जाणीव किंवा शुभाशुभाची कल्पनाही नसणार. त्यामुळेच, जगात सध्या 'एआय मॉरेटोरियम' ही संकल्पना चर्चेत आहे. मात्र, कृत्रिम प्रज्ञेच्या घोडदौडीला आपण लगाम लावायचा आणि इतरांनी मात्र (म्हणजे उदाहरणार्थ चीन) गुपचूप काम करीतच राहायचे, हे कसे चालणार, याही शंकेने जगाला सध्या ग्रासले आहे. 'एआय स्थगित'ची चर्चा सुरू झाली तेव्हा जेफ्री हिंटन यांनी म्हटले होते, 'मी सतत धोक्याची घंटा वाजवतो आहे. याचे कारण मला मानवी अस्तित्वालाच एआयमुळे निर्माण होणारा धोका दिसतो आहे. मला दिसणारा हा धोका तुमच्यापर्यंत पोहोचत असेल तर एआयच्या विकासाची सारी वाटचाल ताबडतोब थांबवायला हवी. हे संशोधन आता पुढे जाऊ देऊ नका...' आता नोबेल पारितोषिक मिळाल्यामुळे तरी हॉपफिल्ड आणि हिंटन यांच्या या रुदनाकडे जग लक्ष देते का, हे समजेलच.अमेरिकी अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील प्रबळ उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी, विजय मिळाल्यास एलन मस्क हे आपल्या मंत्रिमंडळात असतील आणि 'तंत्रज्ञान आयोगा'चे प्रमुख असतील, असे अनेकदा म्हटले आहे. मस्क हे एआयच्या खेळातील महत्त्वाचे खेळाडू आहेत आणि त्यांनी काहीवेळा परस्परविरोधी विधानेही केली आहेत. मात्र, ते आता, एआयचा मानवी कल्याणासाठी वापर करा; नाहीतर एक दिवस मानवजातीचे अस्तित्वच पणाला लागेल, असे म्हणत आहेत. उद्या मस्क मंत्री झाले तर ते आधी अमेरिकेचे हित पाहतील. एआयची जी सुप्त व उघड जागतिक स्पर्धा सुरू झाली आहे; तिच्यावर थेट लक्ष ठेवता यावे, यासाठीच ट्रम्प यांच्या मनात मस्क यांचे नाव आहे.भारतासारखा विकसित होऊ इच्छिणारा देश व काही शहाणे नेते एआयचा वापर कसा शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा यांच्यासाठी करता येईल; याचा विचार करीत आहेत. मात्र, आज एआयच्या एकूण विस्ताराचे चित्र समाधानापेक्षा भयकंपित करणारे बनले आहे. जॉन हॉपफिल्ड आणि जेफ्री हिंटन या वैज्ञानिकांना नोबेल मिळाल्यामुळे तरी जगात एआयच्या दुधारी रूपाची गंभीर चर्चा सुरू व्हायला हवी. अणुबॉम्बनेही मानव जातीसमोर तत्त्वत: अस्तित्वाचे संकट उभे केले. त्यापेक्षा हा धोका बहुपदरी व व्यामिश्र आहे. तो खरेच टळेल ना?

# जनुकांचे नियंत्रण करणारी बटणं

आपल्या घरात वीज येते. घरातल्या सर्व खोल्यांमध्ये ती उपलब्ध असते. पण निरनिराळ्या खोल्यांमध्ये ती वेगवेगळ्या कामांसाठी वापरली जाते. तिच्या मदतीनं मिक्सर किंवा मायक्रोवेव्ह ओव्हन सहसा स्वयंपाकघरातच चालवले जातात. रेफ्रिजिरेटर दिवाणखान्यात सापडत नाही. साहजिकच त्याच्यासाठी दिलेली वीज तिथं कार्यान्वित होत नाही. विजेवरचा गिझर स्नानगृहात तळ ठोकून असतो. त्याला तिथंच वीज पुरवली जाते. आता तर एअर कन्डिशनरसारख्या उपकरणांमध्ये ती केव्हा चालू करायची किंवा किती वेळ चालू ठेवायची, यासाठी व्यवस्था केलेली असते. म्हणजे त्यांना विजेची जोडणी केलेली असते. पण ती केव्हा कार्यान्वित करायची आणि केव्हा बंद करायची हे ठरवता येतं. यासाठीच मग निरनिराळ्या तऱ्हेची आणि निरनिराळ्या क्षमतेची बटणं या उपकरणांना जोडलेली असतात. ती दाबून पंखा चालू करता येतो किंवा टीव्हीवरचा कार्यक्रम बघता येतो. नको तेव्हा परत बटण दाबून त्यांना लगाम घालता येतो. आपल्या शरीरातही काही प्रमाणात अशीच परिस्थिती आहे. आपले शारीरिक आणि शरीरक्रियाविषयक गुणधर्म डीएनए या रसायनापासून बनलेली जनुकंच निर्धारित करतात. जनुकांचा हा वारसा मातापित्यांकडून मिळतो. शरीरातल्या प्रत्येक पेशीत हा संपूर्ण जनुकसंचय हजर असतो. तरीही आपलं जगणं सुरळीत चालू ठेवायचं काम निरनिराळे अवयव त्यांना दिलेलं काम कसं करतात, यावर अवलंबून असतं. प्रत्येक अवयवाचं काम एकमेवाद्वितीय, म्हणजेच इतरांपेक्षा वेगळं असतं. तो अवयव इतरांची जागा घेऊ शकत नाही. हृदयाचं काम तेच करू जाणे. मेंदूचा तिथं उपयोग नाही.प्रश्न असा येतो की मेंदू काय, हृदय काय, यकृत काय... सगळ्यांकडे जनुकांचा तोच वारसा असतो. मग ते नियमित नाही तरी अडअडचणींत तरी एकमेकांची काम का करू शकत नाहीत? आणि तसंच पाहिलं तर नियमितपणेही ते आपलं वेगळेपण कसं काय टिकवून ठेवतात? हे कोडं वैज्ञानिकांना कित्येक वर्षं सतावत आहे. त्याचं एक उत्तर शोधून काढणाऱ्या व्हिक्टर अँम्ब्रोज आणि गॅरी रुव्हकून या दुकलीला यंदाच्या वैद्यकीय नोबेल पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे.कोणत्याही अवयवावर सोपवलेली कामगिरी त्याच्या घटक पेशींकडून पार पाडली जाते. या सर्व शरीरक्रिया विशिष्ट प्रथिनांकडूनच पार पाडल्या जातात. त्या प्रथिनांचं उत्पादन त्या पेशी त्यांच्या जनुकसंचयातील विशिष्ट जनुकांना चालना देऊन करतात. त्या जनुकांमध्ये सांकेतिक भाषेत लिहिलेल्या आज्ञेचं रुपांतर दूत आरएनए या रेणूमध्ये केलं जातं. पण आरएनए ज्यामध्ये लिहिली जाते, त्याची लिपी डीएनएपेक्षा वेगळी असते. तेव्हा सुरुवातीला हे रुपांतर म्हणजे त्या जनुकातील संदेशाचं लिप्यंतर असतं. तो संदेश वाचून मग त्याचं भाषांतर केलं जातं. त्याचं वाचन होऊन प्रथिनाचं उत्पादन होतं.

साहजिकच कोणत्याही एका अवयवात तयार होणारी प्रथिनं दुसऱ्या अवयवात तयार होऊ शकत नाहीत. तसं पाहिलं तर त्या इतर अवयवांमध्येही ती जनुकं असतातच. तरीही ती त्या प्रथिनांचं उत्पादन का करू शकत नाहीत? त्यांच्या मुसक्या कशा आणि कोणी बांधलेल्या असतात? या कोड्याचा उलगडा करणारं संशोधन अँम्ब्रोज आणि रुव्हकून यांनी केलं. त्यांनाही हा शोध तसा योगायोगानंच लागला. वैज्ञानिक भाषेत याला 'सेरेन्डिपिटी' म्हणतात. अनेक पथदर्शी शोध असेच लागलेले आहेत. झालं असं की तीस वर्षांपूर्वी हे दोघे तरुण पीएचडी मिळवल्यानंतर सुरुवातीचा अनुभव घेण्यासाठी एकाच संस्थेत आले होते. तिथं त्यांनी सी. एलिगन्स नावाच्या एका जंतावर काही प्रयोग करायला सुरुवात केली. प्रयोगशाळेत त्यांची वाढ करत असताना त्यातल्या काहींची वाढ पूर्णपणे होत नसलेली त्यांना आढळली. त्या अपूर्ण वाढीचं कारण शोधताना त्यांना असं दिसलं की त्यांच्या जनुकसंचयातील काही जनुकांमध्ये उत्परिवर्तन म्हणजे म्युटेशन झालं होतं. त्या जनुकांच्या संदेशामधील काही अक्षरांमध्ये बदल झाले होते. असा ॉ 'ध चा मा' निसर्गात अनेकदा होतो. आणि तसा झाला की त्या जनुकाला मारलं जातं. त्याची मुस्कटदाबी होते. मग त्याच्याकडून अपेक्षित प्रथिनाची निर्मिती व्हावी कशी? आणि ती न झाल्यामुळं त्या जंतांच्या वाढीला अटकाव झाला नाही तरच नवल.वेगवेगळी परिवर्तनं असलेले असे दोन जंत होते. दुकलीपैकी प्रत्येकानं त्यातला एक उचलला आणि त्याच्या वाढीला अटकाव करणारी जनुकाची मुस्कटदाबी नेमकी होते कशी, याचा छडा लावण्याचा चंग बांधला. त्यांनी केलेल्या प्रयोगांचे निष्कर्ष त्यांनाही अचंबित करून गेले. कारण त्या जनुकांकडून कोणत्याही प्रथिनांचं उत्पादन होत नव्हतं. तर केवळ आरएनएच्या एका इटुकल्या तुकड्याचंच होत होतं. त्याचंच त्यांनी मायक्रो आरएनए असं बारसं केलं. दोघांनाही तसेच निष्कर्ष मिळाले होते. साहजिकच हा केवळ अपवाद नसावा तर नियमच असावा, असा त्यांचा ग्रह झाला.हे आरएनएचे तुकडे करतात तरी काय याचा वेध घेता त्यांना असं दिसून आलं की त्या जनुकाच्या नियमित कामगिरीसाठी जेव्हा लिप्यंतर होऊन दूत आरएनए तयार होतं त्याच्यावरच हे मायक्रो आरएनए ठिय्या देऊन बसतं. तसं करून त्या दूताला आपलं काम निर्विघ्नपणे ते करू देत नाही. साहजिकच त्याच्याकडचा संदेश प्रथिन निर्मितीच्या कारखान्यापर्यंत पोचतच नाही. त्या प्रथिनाचं उत्पादन ठप्प होतं. त्यांनी हे संशोधन एक विक्षिप्त प्रकार म्हणून प्रकाशितही केलं. पण त्याच्याकडे संपूर्ण विज्ञानजगताचं त्यावेळी दुर्लक्षच झालं. इतर कोणी त्याचा मागोवा घेतला नाही.अँम्ब्रोज आणि रुव्हकून वेगवेगळे झाले. निरनिराळ्या संस्थांमध्ये गेले. पण या आपल्या सुरुवातीच्या संशोधनाला त्यांनी वाऱ्यावर सोडलं नाही. सात वर्षांच्या प्रयत्नांनंतर त्यांना त्यांच्या या इटुकल्यांची उपस्थिती सजीव जगतात सर्वत्र पसरलेली असल्याचा साक्षात्कार झाला. मूषकांमध्ये ते होतं, इतर प्राण्यांमध्ये आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे मनुष्यप्राण्यातही होतं. आजवर अशा हजारो मायक्रो आरएनएचे रेणू हाती लागले आहेत. तेच निरनिराळ्या जनुकांना आवश्यक तेव्हा आणि आवश्यक त्या ठिकाणी कार्यान्वित करण्याचं, आणि इतर वेळी किंवा ठिकाणी त्यांना वेसण घालण्याचं, काम करतात याचा नि:संदिग्ध पुरावा त्यांना मिळाला. त्यांनी आपलं काम ठाकठीक केलं तर मग निरनिराळ्या अवयवांची कामगिरीही सुरळीत पार पडते. जगणं सुरळित होतं. आरोग्य राखलं जातं. पण ते बिथरले किंवा त्यांच्यामध्येच काही बेबनाव झाला तर मग नको असलेल्या जनुकांनाही टाच मारली जाते. त्याची परिणती अनारोग्यात आणि मुख्य म्हणजे कर्करोगाला आमंत्रण देण्यात होते. साहजिकच या इटुकल्यांना वेठीला धरून माणसाला छळणाऱ्या मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, कर्करोग यासारख्या ज्यांना जीवनशैलीशी निगडित आजार म्हटलं जातं त्यांचा बंदोबस्त करण्याची नवीन उपचार प्रणाली विकसित करता येईल, अशी आशा वैज्ञानिक बाळगून आहेत.

# जनामनातून प्रगटीत व्हावे,ही बुध्दाची नीती

भोग आणि क्लेश ही जीवनाची आत्यंतिक दोन टोके टाळून या मधला सुलभ, सरळ ज्ञानाचा सन्मार्ग म्हणजे तथागतांचा मध्यममार्ग होय. या मध्यममार्गाचा तथागतांनी केलेल्या शिकवणीचा उपदेश म्हणजे धम्म. डॉ. बाबासाहेबांनी सर्वार्थाने आपला मानला तो अवैदिक, निरीश्वरवादी, अनात्मवादी, भौतिकवादी, तत्वज्ञ–आदिम, साम्यवादी गणसंस्थेशी जीवंत नाते सांगणारा शाक्य गौतम, करुणाघन, मध्यममार्गी, समतावादी, विश्वबंधुत्व, समानता व मानवी स्वातंत्र्य, एकमेकांविषयी प्रेम भावना, करुणेची भावना इत्यादि मानवाच्या कल्याणासाठी हितकारक गुणतत्वे जोपासणाऱ्या विज्ञाननिष्ठ, तर्कशुध्द, निर्भेड व विशुध्द जीवन मार्गावर आधारित अलौकिक अशा पवित्र धम्माची स्थापना करणारे जगातील पहिले क्रांतीकारी महामानव म्हणजेच धर्म संस्थापक महात्मा तथागत भगवान गौतम बुध्द !१४ ऑक्टोबर ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लाखो अनुयायांसाठी महत्त्वाची तारीख आहे. कारण याच तारखेला १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी नागपूर येथे बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. या तारखेला तसेच विजयादशमीला लाखो भाविक दीक्षाभूमीवर गर्दी करतात. मात्र कोविड–१९ महामारीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीने सर्व कार्यक्रम रद्द करून अनुयायांना या ठिकाणी न येण्याचे आवाहन केले होते. बहुतेक घरीच थांबले, परंतु लहान गटातील काही अनुयायांनी दीक्षाभूमीच्या बंद दरवाजा बाहेरून गौतम बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांना आदरांजली अर्पण करण्याचा मुद्दा बनवला. पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान केलेले अनुयायी छोट्या–छोट्या गटात या परिसराला भेट देत होते. काहींनी दीक्षाभूमीच्या वेशीबाहेरून श्रद्धांजली अर्पण केली. काही भाविकांच्या डोळ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेण्यासाठी दुरून पाहण्याचा प्रयत्न केला. नेहमीची गर्दी नसली तरी काही दुकानदारांनी गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्ती विकण्यासाठी तात्पुरते स्टॉल लावले होते. दीक्षाभूमीभोवती काही लोक फिरतील या अपेक्षेने काही संस्थांनी अभ्यागतांना चहा–पाणी वाटण्यासाठी स्टॉल लावले. पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आणि परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले. दीक्षाभूमीकडे जाणारे रस्ते बंद करण्यासाठी बॅरिकेड्स लावण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीनेही या ठिकाणी गर्दी न करण्याचे आवाहन करणारे बॅनर लावले आहेत. समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकांनीही अनुयायांना मार्गदर्शन करण्यात मदत केली.धर्मचक्र प्रवर्तन म्हणजे धर्माचे चक्र फिरवणे म्हणजे महात्मा बुद्धांनी प्राप्त केल्यानंतर दिलेले पहिले धार्मिक प्रवचन. तिसऱ्या शतकात ज्या दिवशी सम्राट अशोकांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती, तो दिवस बौद्ध इतिहासात अशोक विजयादशमी म्हणून साजरा केला जातो. धर्मचक्र किंवा धर्माचे चाक हे भारतीय धर्मांमध्ये वापरले जाणारे प्रतीक आहे. बौद्ध धर्मात याचा व्यापक वापर आहे. हिंदू धर्मात, चिन्ह विशेषतः धार्मिक परिवर्तनाच्या ठिकाणी वापरले जाते. आधुनिक भारतातही या चिन्हाचा वापर आढळतो. बौद्ध धर्मियांचा एक महत्त्वाचा सण म्हणजे, धम्मचक्र प्रवर्तन दिन. दरवर्षी भीम अनुयायी हा सण १४ ऑक्टोबर किंवा विजयादशमी दिवशी साजरा करतात. भारतात 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' हा साजरा केला जाणारा महत्वाचा उत्सव आहे. महाराष्ट्रासह देशभरातील लाखो अनुयायी या दिवशी नागपूरला येतात. धम्मचक्र हे बौद्धधर्माचे प्राचीन काळापासूनचे एक प्रमुख प्रतीकचिह्न आहे. अष्टांगिक मार्गाचे हे चिह्न आहे, ते प्रगती व जीवनाचे प्रतीक सुद्धा आहे. बुद्धांनी सारनाथ मध्ये जो प्रथम धर्मोपदेश दिला होता त्याला धम्मचक्र प्रवर्तन म्हणले जाते.



प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

दलित तरुण (आंबेडकरवादी) हा अधिक पुरोगामी व विज्ञाननिष्ठ बनतो आहे, याचे कारण धर्मांतर आहे. याला राजकिय स्वार्थासाठी गेली ४० वर्षे जाति–धर्माच्या जाळयात अडकवून ठेवण्याचा प्रयत्न होत असला तरीही बंधने झुगारुन देणारी वृत्ती दलित तरुणांमध्ये वेगाने वाढत आहे. याला साक्ष म्हणजे १९७२ नंतरची केवळ दलित तरुणांची आंदोलने आहेत.भगवान बुध्दांच्या व्यक्तिमत्वाची छाप व त्यांच्या तत्वज्ञानाची पकड इतकी मजबुत आहे की, भारत भुमीच्या या महापुत्राने केवळ भारताचाच नव्हे तर संपुर्ण विश्वालाच प्रभावित केलेले आहे. भारताच्या इतिहासामध्ये एवढा प्रतिभा संपन्न, प्रखर बुध्दीवादी, ध्येयवादी व मानवतावादी अजून कधी झालेला नाही. यापुढे देखील होणे नाही ज्याला संपुर्ण जग सन्मान पुर्वक विनम्र होत असते. बुध्द हा अशा स्वयं प्रज्ञेचा माणुस होता की, ज्याने जगाला पहिल्यांदा प्रखर बुध्दीवादाची व ध्येयवादाची शिकवण दिली. भगवान बुध्द म्हणतात, अत्त–दिपो–भव, अत्त–विरहत, अत्त–सरणा अर्थात हे मानव प्राण्यांनो स्वत:चे दिप व्हा, स्वयं प्रकाशित व्हा आणि स्वत:ला शरण जावून स्वत:चच विचरण करा, दुस–या कुणालाही शरण जावू नका, दुसरा कुणीही तुम्हाला शरण जाण्या योग्य नाही तुम्ही स्वत:च स्वत:चे शरणस्थान आहात, यामध्ये जगाच्या सभ्यतेचा व संस्कृतीच्या इतिहासामध्ये भगवान बुध्दाने पहिल्यांदा मनुष्याला परा प्रवृत्ती, दैव, ईश्वर, आत्मा परमात्मा संकल्पना पासून मुक्त होण्याचा महामंत्र दिला व तो जोपासून ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे. बुध्दाचे चरित्र आणि चारित्र्य निर्मळ पाण्याच्या प्रवाहा सारखे होते. तो करुणेचा महासागर होता, रंजल्या गांजल्यांचा तो कैवारी, सखा, मित्र आणि मार्गदर्शक होता. जगाच्या इतिहासात अशी माणसे अपवादात्मक असतात अशा सम्यक सम्बुध्दाला अनुसरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्या पुढे सर्जनशील आदर्श निर्माण केला. बुध्द–बाबासाहेब हे आमच्या सर्वकष मुक्तीचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी आम्हाला सन्मार्ग उपलब्ध करुन दिला आहे. मार्गक्रमण आम्हाला करावयाचे आहे. त्यासाठी स्वयं प्रकाशित होवून आम्ही बुध्द–धम्म व संघ यांच्या प्रती एकनिष्ठ राहून धम्मचक्र प्रवर्तनाची सम्यक क्रांती गतीमान ठेवली पाहीजे. ६८ व्या धम्मक्रांतीच्या समस्त जनतेला मन:पूर्वक शुभेच्छा !

# माझ्याकडे १ पैसाही सापडला नाही:नालासोपारा येथील घटनेमागे भाजपचा कोणताही नेता नाही, तावडेंनी फेटाळला विरोधकांचा आरोप

**मुंबई (वृत्तसंस्था)**–भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी बुधवारी नालासोपारा येथे घडलेल्या घटनेमागे कोणतेही कट कारस्थान नसल्याचा दावा केला आहे. काल मी नालासोपारा येथे जाणार असल्याची माहिती भाजपच्या कोणत्याही नेत्याला नव्हती. मी अचानक तिथे गेलो होतो. त्यामुळे त्या घटनेमागे काही कारस्थान असल्याचा आरोप चुकीचा आहे, असे त्यांनी म्हटले आहे.विनोद तावडे यांना मंगळवारी विरार पूर्वच्या मनोरीपाडा येथील विवांत हॉटेलमध्ये कथितपणे पैसे वाटताना पकडण्यात आले होते. त्यानंतर खासदार संजय राऊत यांच्यासह अन्य विरोधी पक्षांच्या नेत्यांनी ही घटना भाजपच्याच अंतर्गत राजकारणातून घडल्याचा दावा केला होता. तसेच या प्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला होता. या पार्श्वभूमीवर विनोद तावडे यांनी बुधवारी आपला मताधिकार बजावल्यानंतर आपली बाजू स्पष्ट केली.विनोद तावडे म्हणाले, मी नालासोपारा इथे जाणार हे भाजपमधील कोणत्याच नेत्याला ठावूक नव्हते. कारण, वाड्याहून परत येताना मी उमेदवार राजन नाईक यांना फोन केला. त्यांच्याकडून मतदारसंघातील स्थितीची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी मी कार्यकर्त्यांसोबत असल्याचे सांगितले. तसेच मला चहासाठी येण्याचीही विनंती केली. मला वाटले तिथे १०-१२ जण असतील असा विचार करून तिथे गेलो.त्यामुळे यात कुणाचेही कट कारस्थान नाही. आपसातील वाद नाही किंवा इतर कोणतेही कारण नाही. माझ्या मते, विरोधी पक्षांना आपला पराभव डोळ्यापुढे दिसत असल्यामुळे त्यांनी एका राजकीय घटनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. पोलिस किंवा निवडणूक आयोगाला काहीच मिळाले नाही. त्यानंतरही असे म्हणणे हे चुकीचे आहे. माझ्याकडे एक पैसाही सापडला नाही. त्यामुळे हे प्रकरण दाबण्याचा प्रश्नच येत नाही, असे ते म्हणाले.विनोद तावडे यांनी यावेळी आपल्यावर विश्वास दाखवल्याबद्दल शरद पवारांचेही आभार मानले. शरद पवार एक समंजस नेते आहेत. ते खूप ज्येष्ठ आहेत. ते मला खूप जवळून ओळखतात. त्यामुळे असा प्रकार मी करू शकत नाही हे त्यांना चांगलेच ठावूक आहे, असे ते म्हणाले.

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या कॅशकांडामागे राज्याचे गृहमंत्री अर्थात देवेंद्र फडणवीस असल्याचा आरोप केला आहे. याविषयी पत्रकारांनी पुन्हा एकदा विनोद तावडे यांना छेडले असता त्यांनी संजय राऊत खोटे बोलत असल्याचा दावा केला. संजय राऊत खोटे बोलत आहे. चुकीचा दावा करत आहेत. मी तिथे जाणार आहे हे केवळ मलाच माहिती होते. केवळ २ मिनिटांत हा कार्यक्रम ठरला होता. माझे तिथे जाणे अचानक झाले. त्यामुळे या आरोपांत कोणतेही तथ्य नाही, असे तावडे म्हणाले.

विनोद तावडे यांनी यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या निवडणुकीत बिटकॉईन वाटपाच्या मुद्यावरही भाष्य केले. ते म्हणाले, माझ्या मते ज्या गोष्टी आपल्याला माहिती नाहीत, त्या ऑथेंटिक गोष्टी आमच्या सुधांशू त्रिवेदी यांनी सांगितल्या आहेत. सुधांशु त्रिवेदी ठोस माहिती असल्याशिवाय पत्रकार परिषद घेत नाहीत. सुप्रिया सुळे यांनी आपले म्हणणे मांडले आहे. त्यांनी चौकशीची मागणी केली आहे. पुढे चौकशी होईल व त्यातून वस्तुस्थितीही समोर येईल.सुप्रिया सुळे यांनी काल माझ्याविषयी काल माझ्याकडे ५ कोटी असल्याचे खोटे विधान केले. परंतु माझ्याकडे एक पैसा मिळाला नाही. त्यामुळे सुप्रिया सुळेंनी माझे ५ कोटी मला परत करावे, असेही विनोद तावडे यावेळी बोलताना म्हणाले.बहुजन विकास आघाडीच्या आरोपानुसार, भाजप सरचिटणीस विनोद तावडे मंगळवारी विरार पूर्वच्या मनोरीपाडा येथील विवांत हॉटेलमध्ये आले होते. त्यांच्यासोबत भाजप उमेदवार राजन नाईक व भाजपचे काही पदाधिकारी होते. ते तिथे पैसे वाटत होते. त्यावेळी बविआचे काही कार्यकर्ते हॉटेलमध्ये आले. त्यानंतर तिथे प्रचंड राडा झाला. हा प्रकार समजताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन स्थितीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. यावेळी दोन्ही बाजूंनी घोषणाबाजी झाली. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल होत आहे.विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत पुण्यातील माजी पोलीस अधिकारी रवींद्र पाटील यांच्या आरोपाने खळबळ उडाली. रवींद्र पाटील यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर निवडणुकीत परकीय चलन वापरल्याचा व अनेक आर्थिक व्यवहारांसाठी बिटकॉइनचा वापर केल्याचा आरोप केला. भाजपा खासदार व प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी मंगळवारी रात्री एका पत्रकार परिषदेमध्ये हा आरोप केला. तसेच यासंबंधीची कॉल रेकॉर्डिंग व व्हॉट्सएप चॅट्सचे स्क्रीनशॉटही दाखवले. भाजपाच्या या आरोपांनंतर सुप्रिया सुळेंनी आपल्यावरील आरोप फेटाळलेत. शरद पवारांनीही हे आरोप जोरकसपणे फेटाळून लावलेत.

## अँड.स्वप्निल गलधर यांची शिवसेना ( शिंदे गट) पक्षाच्या बीड जिल्हा प्रमुखपदी निवड

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



शिवसेना मुख्य नेते माननीय एकनाथजी शिंदे ( मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या जिल्हा प्रमुखपदी (कार्यक्षेत्र आष्टी/ पाटोदा / गेवराई विधानसभा ) नियुक्ती शिवसेना सचिव संजय पुष्पलता भाऊराव मोरे यांच्या स्वाक्षरीने करण्यात आली असुन वंदनीय हिंदू हृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण यांचा सक्रियपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास व्यक्त केला आहे.

आज सायंकाळी लिंबागणेश येथे अँड, स्वप्निल गलधर यांची शिवसेना जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल स्व.अमोलभैय्या गलधर युवा मंच लिंबागणेश यांच्या वतीने गावच्या मुख्य प्रवेशद्वारावर शिवतीर्थ लिंबागणेश याठिकाणी आतिषबाजी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले.यावेळी एकच भैय्या, स्वप्निल भैय्या घोषणाबाजी करण्यात आली.

## १०४ वर्षीय केरु कोकरे यांनी नातवासह मतदानाचा हक्क बजावला

**करमाळा । प्रतिनिधी**



करमाळा तालुक्यातील कुगाव येथील १०४ वर्षीय ज्येष्ठ नागरिक केरु (नाना) विठोबा कोकरे यांनी २०२४ च्या विधानसभेसाठी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. केरु कोकरे यांनी आपल्या नातू तथा पश्चिम महाराष्ट्र वेतन पडताळणी अधिकारी दयानंद धुळाभाऊ कोकरे यांच्यासमवेत करमाळा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले.भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५२ पासून झालेल्या प्रत्येक लोकसभा निवडणुकीत तसेच १९६२ पासून महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या विधानसभा निवडणुकीपासून त्यांनी सातत्याने मतदानाचा हक्क बजावला आहे.लोकशाहीच्या बळकटीसाठी योगदान देणाऱ्या केरु कोकरे यांचे कार्य प्रेरणादायी असून, त्यांची मतदानाची परंपरा पुढच्या पिढ्यांसाठी आदर्श आहे.

## जिल्ह्यात सहा केंद्रीय मतमोजणी निरीक्षक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सहाही मतदार संघासाठी केंद्रीय मतमोजणी निरीक्षक यांची नियुक्ती भारत निवडणूक आयोग यांनी केली आहे. त्यानुसार गेवराईसाठी लालटनपुई वॉनचाँग (मणिपूर ), माजलगावसाठी मनोज कुमार (बिहार), बीडसाठी विजयकुमार जयरामन (कर्नाटक), आष्टीसाठी श्रीमती पूजा अग्निहोत्री (उत्तर प्रदेश), केजसाठी सुनील अंचिपका (गोवा) आणि परळीसाठी श्रीमती ईला तिवारी (मध्य प्रदेश) केंद्रीय मतमोजणी निरीक्षक असतील.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांनी त्यांच्या दालनात पूजा अग्निहोत्री यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्सगी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) महेंद्रकुमार कांबळे उपस्थित होते.



## हजरत टिपू सुलतान यांची जयंती उत्साहात साजरी

**शेख नसिर । लहुरी प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लहुरी गावात हजरत टिपू सुलतान यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली

दि. २०/११/२०२४ लहुरी गावातील तरुणांनी एकत्र येऊन हजरत सुलतान जयंती साजरी करण्यात आली बुधवार २० नोव्हेंबर रोजी टिपू सुलतान यांची जयंती विविध मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित समाजबांधव आणि ग्रामस्थांच्या वतीने टिपू सुलतान यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी गावातील जयंती समितीचे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी मनागेत व्यक्त करताना सांगितले की, टिपू सुल्तान यांचा जन्म २० नोव्हेंबर १७५१ रोजी कर्नाटकातील देवनहल्ली येथे झाला होता. ते म्हैसूर राज्याचे शासक होते, त्यांच्या धाडस आणि युध्द-



कौशल्यासाठी ते प्रसिद्ध होते. त्यांना टायगर ऑफ म्हैसूर म्हणून ओळखले जाते१९८२ साली हैदर अलीच्या मृत्यूनंतर टिपू सुलतानाने म्हैसूरचे कारभार सांभाळला. त्यांना प्रशासनात सुधारणा केल्या आणि शेतकऱ्यांच्या भल्यासाठी अनेक उपाय योजना केल्या ते आधुनिक तोफा आणि लष्करी तंत्रज्ञान वापरणारे पहिले भारतीय शासक होते. टिपू सुलतान यांनी ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध चारवेळा युध्दे लढली. पहिले युध्द आणि दुसरे युध्द इंग्रजांविरुद्ध धाडसी लढाया देउन इंग्रजांना आव्हान दिले होते. यावेळी मोठया संख्येन तरुण तसेच गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## मतमोजणी कर्मचाऱ्यांचे सरमिसळीकरण पूर्ण

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या मतमोजणी कर्मचाऱ्यांचे सरमिसळीकरण आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात निवडणूक निरीक्षक, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत पार पडले.

जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात नियुक्त करण्यात आलेल्या मतमोजणी पर्यवेक्षक, सहायक आणि सुक्ष्म निरीक्षक यांचे रॅन्डमायझेशन (सरमिसळीकरण) झाले. ही प्रक्रिया गेवराई, माजलगावच्या निवडणूक निरीक्षक लालटनपुई वाँगचाँग, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक, प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, केज विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक वजाळे यांच्या उपस्थितीत पार पडली.



तर ऑनलाईन माध्यमातून केज व परळी विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक सुनील अंचिपका उपस्थित होते.

यावेळी सहाही मतदारसंघातील प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व उमेदवारही उपस्थित होते. या प्रक्रियेचे अवलोकन त्यांनी केले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी त्यांना सविस्तर माहिती दिली. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी व उमेदवार यांनीही या प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत समाधान व्यक्त केले.

ही प्रकिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, एनआयसीचे जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी भाऊसाहेब बांगर यांनी परिश्रम घेतले.

## मराठा समाजाबद्दल अपमानास्पद वक्तव्य कालीचरण महाराजांविरुद्ध गुन्हा दाखल करा

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

मराठा समाजाबद्दल अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्या कालीचरण महाराजांविरुद्ध गुन्हा दाखल करावा, अशी मागणी आज समस्त मराठा समाजाच्या वतीने पोलिसांकडे करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली शांतता व लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहे. वेळोवेळी झालेल्या आंदोलनांमध्ये कायदा व सुव्यवस्थेचे पालन समाजाने केले आहे. मात्र समाजातील काही मंडळी मराठा समाजाबद्दल विवादास्पद वक्तव्य करून दंगली भडकाव्यात म्हणून वक्तव्य करत आहेत. अशाच प्रकारचे वक्तव्य नुकतेच कालीचरण महाराज यांनी केले असून, यामधून समाजामध्ये दुही निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तसेच मराठा समाजाचा अपमान होईल, असे वक्तव्य त्यांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करावा, अन्यथा मराठा समाज जोरदार आंदोलन करेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी शंकर अधाने, राजू चव्हाण, दत्ता मालोदे, बाबासाहेब बारगळ, पुंजाअण्णा नालावडे, आजिनाथ नागे,. शरद भागडे, बाळासाहेब शेळके, साहेबराव काळे, अरुण अधाने, अभिषेक जाधव, कृष्णा अधाने, सचिन जाधव, आदित्य काळे, कडुबा सोष्टे, अक्षय साळुंखे, शुभम गोरे, समाधान शिंदे, गजाहरी मस्कर, संतोष कुबेर, बाळू शेळके, बबन औटे, भाऊसाहेब वाकळे, रवींद्र काळे, सूरज जाधव यांच्यासह मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी सपत्नीक बजावला मतदानाचा हक्क

**जालना । असलम कुरेशी**

लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावावे असे आवाहन करीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ आणि त्यांच्या पत्नी अश्विनी पांचाळ यांनी जालना येथील मत्स्योदरी महाविद्यालय येथील मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावला.यावेळी डॉ.पांचाळ यांनी मतदान केंद्रातील केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांच्याशी संवाद साधुन मतदान प्रक्रियेबाबतची माहिती घेतली.तसेच मतदानासाठी आलेल्या मतदारांशी देखील त्यांनी संवाद साधत



मतदान करण्याचे आवाहनकेले.यावेळी मतदारसंघातील विविध मतदान केंद्रावर युवा मतदारासह ज्येष्ठ मतदार आणि महिला मतदारांनी देखील उत्साहाने आपला मतदानाचा हक्क बजावला.

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत

### मतदान संपेपर्यंतची आकडेवारी अद्याप प्राप्त व्हायची आहे


### छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

विधानसभा निवडणूक २०२४ करीता जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदार संघात मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडली. जिल्ह्यातील मतदारांमध्ये मतदानासाठी उत्साह दिसून आला.

सायं. ५ वाजेपर्यंत जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघनिहाय झालेले मतदान टक्केवारी याप्रमाणे-

१०४- सिल्लोड-७०.४६ टक्के, १०५- कन्नड-६२.२० टक्के, १०६- फुलंब्री-६१.४९ टक्के, १०७-औरंगाबाद मध्य-५३.९८ टक्के, १०८-औरंगाबाद पश्चिम-५२.६८ टक्के, १०९- औरंगाबाद पूर्व-५५.७६ टक्के, ११०- पैठण-६८.५२ टक्के,



१११- गंगापूर-६०.५६ टक्के, ११२-वैजापूर-६४.२१ टक्के. असे एकूण सरासरी ६०.८३ टक्के मतदान झाले होते. सायं. ५ ते ६ वा. पर्यंतच्या म्हणजेच मतदान संपेपर्यंतची आकडेवारी अद्याप प्राप्त व्हायची आहे.

## जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात पाच वाजेपर्यंत ६४.१७ टक्के मतदान

**जालना । असलम कुरेशी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने जालना जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापूर आणि १०३-भोकरदन या विधानसभा मतदारसंघातील १ हजार ७५५ मतदान केंद्रांवर आज मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत मतदान पार पडली. या मतदार संघात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ६४.१७ टक्के मतदान झाले आहे.

आज पार पडलेल्या मतदान प्रक्रियेनुसार सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघनिहाय झालेले मतदान टक्केवारी पुढील प्रमाणे आहे. यामध्ये ९९-परतूर ६२.०६ टक्के, १००-घनसावंगी ६६.५७ टक्के, १०१-जालना ५९.१२ टक्के, १०२-बदनापूर ६५.२२ टक्के आणि १०३-भोकरदन ६८.१५ टक्के असे एकूण सरासरी ६४.१७ टक्के मतदान झाले होते. मतदानाची सायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंतची म्हणजेच



मतदान संपेपर्यंतची आकडेवारी अद्याप प्राप्त व्हायची आहे.

विधानसभा मतदार संघातील काही अनेक ठिकाणी मतदानाची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरु होती. पाचही विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व मतदारांचे आभार मानले.

## केज तालुक्यात ६३.४८ टक्के मतदान लोकसभे सारखा उत्साह मतदारात जाणवला नाही

# विडा येथे मतदान केंद्रा बाहेर दोन गटात हाणामारी

**गौतम बचुटे । केज**

केज विधानसभेच्या निवडणुकीत ६३.४८ टक्के मतदान झाले. सर्वत्र मतदान शांततेत पार पडले. मात्र विडा येथे मतदान केंद्रा बाहेर दोन गटात हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. तर विधान सभेच्या निवडणुकीत लोकसभे प्रमाणे मतदारात उत्साह जाणवला नाही.

३२३-केज (अ.जा.) मतदार संघात ३ लाख ८७ हजार २२१ एवढी मतदारांना मतदान करण्यासाठी ४२० मतदान केंद्र होते. ३ लाख ८७ हजार २२१ मतदारा पैकी १ लाख ३० हजार ८५४ पुरुष तर १ लाख १४ हजार ९४३ स्त्री आणि २ तृतीय पंथी असे एकूण २ लाख ४५ हजार ७९९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण मतदानाच्या ६३.४८ टक्के एवढे मतदान पार पडले.

मतदार संघात दिव्यांग आणि नवमतदारांमध्ये उत्साह जाणवला परंतु ऊस तोडणीसाठी साखर कारखान्याकडे स्थलांतरित झालेले मतदार हे मतदानासाठी न आल्याने मतदानाचा टक्का घटला असल्याची चर्चा आहे.

मतदान शांततेत मतदान पार पडले. मात्र विडा या गावात मतदान केंद्रा बाहेर दोन गटात हाणामारी झाल्याची घटना घडली. दरम्यान मतदान केंद्रावर मतदान यंत्र बंद पडून मतदानात व्यत्यय आल्याची एकही घटना घडलेली नाही. दरम्यान मतदारसंघात सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त आणि सीमा सुरक्षा दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आलेल्या होत्या. रात्री उशिरा पर्यंत स्ट्राँग रूम मध्ये मतदान पेट्या येत आहेत.

**सखी केंद्र आणि दिव्यांगासाठी मतदान केंद्र :-** केज पंचायत समितीच्या इमारतीत डिव्यांग मतदारांसाठी दिव्यांग मतदान केंद्र तर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या इमारतीत सखी मतदान केंद्र होते. या मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारावर रांगोळीद्वारे मतदानाचा संदेश दिलेला होता. तर प्रवेशद्वारावर कमान उभारून सुशोभित करण्यात आले होते.तसेच मतदान करून आल्या नंतर सेल्फी काढण्यासाठी सेल्फी पॉइंट देखील होता.

मतदान शांततेत आणि सुरळीत होण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी दिपक वजाळे यांच्यासह सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विलास तरंगे, राकेश गिड्डे, प्रियंका टोंगे, समृध्दी दिवाणे यांनी काम पाहिले. तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, सहाय्यक पोलीस निरीक्षक बनसोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे, पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस उपनिरीक्षक कादरी यांच्या सह सीमा सुरक्षा दलाचे जवान, दंगल नियंत्रक पथक आणि गृह रक्षक दलाचे जवान यांचा मतदान केंद्रावर तगडा बंदोबस्त होता.

**खा. बजरंग सोनवणे यांनी बजावला मतदानाचा हक्क :-** खा. बजरंग सोनवणे यांनी त्यांच्या जन्म गावी सारणी (आं) तालुका के ज येथे मतदान करून मतदानाचा हक्क बजावला.

**दिव्यांग मतदार आणि नव मतदारांत उत्साह :-** दिव्यांग मतदार, वयोवृध्द मतदार आणि नव मतदार यांच्यात मतदान करताना उत्साह जाणवला.

**९२ वर्षाच्या आजीबाईने सुद्धा केले मतदान :-** केज येथे ९२ वर्षाच्या आजीबाई सुमन व्यंकटराव कुलकर्णी यांनी मतदानाचा हक्क बजावला.

**विड्यात बोगस मतदान करण्यावरून दोन गटात हाणामारी : हाणामारीचा व्हिडिओ व्हायरल :-** केज तालुक्यातील विडा येथे बोगस मतदान करण्यावरून भाजप व राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये चांगलीच हाणामारी झाल्याचा प्रकार विडा (ता. केज) येथील मतदान केंद्रावर घडला. या हनामारीचा व्हिडीओ ही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

केज विधानसभा मतदार संघात येत असलेल्या विडा (ता. केज) येथे मतदान केंद्रावर बुधवारी सकाळपासून शांततेत मतदान सुरू असताना दुपारी एक जण बोगस मतदान करताना समोर आल्यानंतर भाजप गटाने विचारणा केली. यावेळी भाजपचा स्थानिक नेता व शरद पवार गटाचे सरपंच व त्यांचे वडील यांच्यात मतदान केंद्रावर हाणामारी सुरू झाली. कार्यकर्त्यांनी सोडवा सोडवा करण्याचा प्रयत्न केला. एकमेकांच्या अंगावर धावून जाऊन त्यांनी एकमेकांना मारहाण केली. ही मारामारी सुरू असताना काढलेला व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. पोलिसांच्या मध्यस्थीने त्यांच्यातील हा वाद मिटला असून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली आहे. या घटनेची माहिती मिळताच केजचे सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांनी घटनास्थळी भेट देऊन शांत राहण्याचे आवाहन केले. याप्रकरणी केज पोलिसात गुन्हा दाखल झालेला नव्हता.

# पैठण तालुक्यात शांततेत मतदान १७ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद

**पैठण । प्रतिनिधी**

ता.२० पैठण तालुक्यामध्ये विधानसभेच्या तीन लाख २३ हजार ३५३ मतदारांपैकी दोन लाख २२ हजार ९४० मतदार राजांनी आपला मतदानाचा हक्क बजावला त्यामध्ये एक लाख पंधरा हजार २८० पुरुष मतदार होते त्याचबरोबर महिलांनी सुद्धा एक लाख सात हजार सहाशे आठ मतदानाचा हक्क बजावला यामुळे पैठण तालुक्यात पुरुषांपेक्षा महिलांची टक्केवारी १८,८४. जास्त असल्याचे दिसून आले याचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शिंदे सरकारची लाडकी बहीण या योजनेमुळे महिलांचा मतदानाची टक्केवारी वाढली आणि हीच टक्केवारी जर शिंदे गटाच्या पारड्यात पडली तर निकाल वेगळाच लागेल अशी चर्चा पैठण तालुक्यात ऐकावयास मिळते पैठण तालुक्यात १५६१०९, महिला आहेत तर पुरुष वर्ग हा १६९२३९ एवढा आहे क्या बात है तर पैठण तालुक्यात महिलांपेक्षा पुरुष वर्गाची संख्या ७ हजार ६२० जास्त आहे परंतु मतदानाचा हक्क बुधवारी २० नोव्हेंबरला महिलांनीच जास्त बजावला आहे पैठण तालुक्यात तृतीय पंथाची ५ संख्या आहे परंतु त्यांनी कोणत्या कारणामुळे मतदानाकडे पाठ फिरवली हे मात्र कोणत्याच पक्षाकडे उत्तर नाही,पैठण तालुक्यात किरकोळ बाचाबाची किंवा इतरत्र मध्यप्रेमी यांचा वाद वगळता सर्वत्र शांततेत मतदान झाले आता पैठण तालुक्यात पुरुष वर्गणी ११५२८० महिला वर्ग१०७६६० या महिला व पुरुष वर्गांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

पैठण तालुक्यातील शिंदे गटाकडून विद्यमान खासदार यांचे पुत्र विलास भुमरे, तर उभाठा गटाकडून दत्तात्रय गोरडे या उमेदवाराबरोबर रासपाचे प्रकाश दिलवाले यांच्यासह तब्बल १७ उमेदवारांचे भवितव्य २० नोव्हेंबर बुधवार रोजी सकाळी सात सायंकाळी सहा पर्यंत तब्बल दोन लाख २२०००, ९४० मतदार बंधूंनी मतदानाचा हक्क बसवून इलेक्ट्रॉनिक मतपेटीत बंद केले आहे त्यामुळे पैठण तालुक्यात खरी लढत शिंदे गटातर्फे विलास बापू तर उभाठा गटांकडून दत्तात्रय गोरडे यांच्यातच टक्कर होणार असल्याचेही चित्र पाहावयास मिळते मतदान झाले आता गावगाव एकच चर्चा आमच्या गावात बांध चालला, काही म्हणतात आमच्या गावात नंबर एक वर मशाल चालली काही ठिकाणी रोलर चाललं पण कोणत्या गावात काय चालले आणि कोण उमेदवार विजयी होणार २३ नोव्हेंबर शनिवारी किमान दुपारचे बारा वाजेपर्यंत जनतेला समजणार आहे त्यामुळे उमेदवाराबरोबरच मतदार राजांच्या मनात सुद्धा धाकधूक सुरू झाली असे पाहावयास मिळते.

# मतदान करणे भारतीय नागरिकाचा अधिकार जसा आहे,तसे कर्तव्य आहे

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

लोकशाही जतन व संवर्धन करण्यासाठी नेहमीच आपण कर्तव्य म्हणून जबाबदारीने व विवेकाने मत दिले पाहिजे..आपले देश विषयक स्वप्न पूर्ण करण्यासाठी योग्य सरकारची निवड करण्याचा अधिकार आपण वापरला पाहिजे ..एकेक मत महत्वाचे आहे...मत ही आपली स्वतः ची किंमत आहे..एक व्यक्ती एक मत ..हा समानतेचा अधिकार देखील संविधानाने दिला आहे.. आपण नेहमीच भारतीय संविधानप्रति कृतज्ञ राहिले पाहिजे. सामजिक आणि आर्थिक विषमता दूर करायची आहे,भारताला भारतीय म्हणून जगात एक चांगली प्रतिमा मिळवून द्यायची आहे ,भ्रष्टाचार दूर करायचा आहे,संविधनिक लोकशाही संवर्धन करायचे आहे.. बंधुता देशात वाढवायची आहे, प्रत्येकाचे स्वातंत्र्य आपल्याला जपायचे आहे,कायद्याचे पालन करायचे आहे,स्त्री पुरुष समता आचरणात आणायची आहे, बेकारी




दूर करायची आहे ,हाताला नियमित रोजगार मिळतील अशी व्यवस्था करायची आहे,हुकूमशाही ,धर्मांध सत्ता येणार नाही याची काळजी घ्यायची आहे..येणाऱ्या पिढ्यांचे जीवन सुखी समृद्ध होण्यासाठी चांगले पर्यावरण निर्माण करायचे आहे ..यासाठी आपले मत हे खूपच महत्वाचे आहे..जनता जागरूक झाली तर मत योग्य व्यक्तीस देऊन प्रतिनिधित्व योग्य होईल.जनताच पैसे घेऊन मत देऊ लागली तर मग देशाचे प्रतिनिधित्व चांगले होणार नाही..त्यासाठी मत देताना देखील एक नैतिक माणूस म्हणून ,मी जबाबदारीने वर्तन केले पाहिजे..चुकीचे सल्ले न देता ,जनतेला गुमराह न करता हितकारी मार्ग सांगितला पाहिजे तेंव्हा खरे आपण भारतीय.स्वार्थासाठी देशाची घडी विस्कळीत होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे.नव्हे देशाची जबाबदारी घेणाऱ्या युवकांची नीतिमान पिढी घडवण्याची जबाबदारी आपली आहे याचे भान आपण ठेवले पाहिजे.. म्हणूनच मतदान केले पाहिजे..निवडून आलेल्या प्रतिनिधीने देखील आपले आचरण नीतिमान ठेवले पाहिजे नाहीतर व्यक्तिगत लाभासाठी आपल्याला ज्यांनी मत दिले त्यांचा विश्वासघात करता कामा नये..भारतीय संविधानात सांगितलेल्या नागरिकांची कर्तव्य आपण जबाबदारीने केली पाहिजेत असे मला वाटते.

**प्रा.डॉ.सुभाष वाघमारे**
**प्रभारी संचालक,भाषा मंडळ**
**कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा**

# पैठण तालुक्यातील ढाकेफळ,एक तुनी मध्ये मतदान अधिकारी,यांच्यात बाचाबाची,तर ढाकेफळ गावात पोलिसाबरोबर शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांची हुल्ल बाजी

**पैठण । प्रतिनिधी**

ढाकेफळ येथील शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांनी आखून दिलेल्या नियंत्रण रेषेच्या आत मधी गर्दी केली म्हणून एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस बंदोबस्त असलेले कर्मचारी व बाहेर गाऊन आलेले पोलीस कर्मचारी पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यासाठी उपस्थित होते. नियंत्रण रेषेच्या बाहेर जाण्यास वरील अधिकाऱ्याने सांगितले असता कार्यकर्त्यांनी सेवेवर कार्यरत असलेले पोलीस बांधवांना आरे वरेची भाषा करून हुज्जत घालण्यास सुरुवात केली परंतु सह पोलीस निरीक्षक एकनाथ नागरगोजे, आणि सह पोलीस निरीक्षक एमआयडीसी पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष ईश्वर जगदाळे यांनी कार्यकर्त्याला मधुर भाषेत समजावून त्यांना निवडणूक नियंत्रण रेषेच्या बाहेर उभे केले व हुल्लडबाजी करणाऱ्या बोटावर मोजण्या इतक्या कार्यकर्त्यांना बाजूला करून शांतता प्रस्थापित केली यामुळे पुढील कुठलाही अनुचित प्रकार ढाकेफळ गावात घडला नाही,तर एक तुनी गावात मतदानाच्या रांगेत मतदार राजा उभे होते परंतु मतदानाची सकाळी सात ते सायंकाळी सहा पर्यंत वेळ होती परंतु मतदार पुरुष व महिला रांगेत उभे आहे हे पाहून तिथे निवडणूक बूथ अधिकारी यांनी वेळ संपली परंतु मतदार राजा आम्ही रांगेत उभा आहोत आम्हाला मतदान करायचे आहे हे सांगत होते परंतु काय अधिकारी मात्र जोरातच होते .त्यांनी पुन्हा तीच सूचना केली वेळ संपली परंतु मतदार राजा आम्हाला मतदान करायचे आहे आणि आम्ही ते करणारच अशी ठणकावून सांगितल्याने अधिकारी चिडले व मतदार व अधिकारी यांच्यात थोडक्यात शाब्दिक चकमक उडाली एकतुनी गावात पाहावयास मिळाली या मुजोर अधिकाऱ्याला बडतर्फ करावे किंवा कडक शासन करावे अशी चर्चा मतदार राजाची चर्चा एक तुनी गावात ऐकावयास मिळाली.

# सोयगाव शहरात ७० टक्के मतदान, आमखेडा जरंडी ला लोकसभेपेक्षा मतदानाची टक्केवारी वाढली

**सोयगाव । प्रतिनिधी**

सोयगाव शहरात विधानसभा साठी एकूण मतदार सात हजार २४ पैकी चार हजार९९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजवला आहे यामध्ये दोन हजार५२५ पुरुष व दोन हजार ४०१ महिलांनी मतदानाचा हक्क बजवला आहे त्यामुळे शहरात ७० टक्के मतदान झाले असून आमखेडा, जरंडी मतदान केंद्रावर लोकसभेपेक्षा विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढली असून शहरासह आमखेडा, जरंडी परिसरात बुधवारी आमखेडा येथे एकूण दोन हजार ८९३ पैकी दोन हजार१८७ मतदारांनी हक्क बजावून ११२९ पुरुष व १०५८ महिलांनी मतदानाचा हक्क बजवला आहे ७४ टक्के मतदान झाले आहे जरंडी गावात २७९९ पैकी २११९ मतदारांनी हक्क बजावला आहे ७५ टक्के मतदान झाले दरम्यान मतदानाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडला नाही सोयगाव पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता शहरात एकूण आठ तर आमखेडा जरंडी येथे प्रत्येकी तीन मतदान केंद्रावर मतदान झाले आहे पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी मतदान केंद्रावर भेटी दिल्या होत्या.


# श्रीक्षेत्र दत्तधाम सारडगाव येथे श्री.दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा,दत्तयाग व चार दिवसीय कीर्तन महोत्सव

## सोहळ्याला बद्रिनाथहून जगद्गुरू शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्यासह संत महंत राहणार उपस्थित

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग वैद्यनाथाच्या पावन पंचक्रोशीत निर्माण होत असलेल्या श्री क्षेत्र दत्तधाम (अध्यात्मिक उन्नती केंद्र), गोपाळपुरा, सारडगांव, परळी-धर्मापुरी रोड, परळी वैजनाथ, जि. बीड येथे श्री.दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग व चार दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या भव्य दिव्य सोहळ्याला बद्रिनाथहून जगद्गुरू शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्यासह संत महंत उपस्थित राहणार आहेत.

ह.भ.प. विद्यावाचस्पती डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज (निर्माणकर्ते श्री. दत्तधाम, अध्यामिक उन्नती केंद्र) यांनी या सोहळयाबाबत सविस्तर माहिती दिली.मार्गशीर्ष प्रतिपदा, सोमबार दि. २ डिसेंबर २०२४ ते मार्गशीर्ष शुक्ल विनायक चतुर्थी, गुरुवार दि. ५ डिसेंबर २०२४ या चार दिवसीय कालावधीत हा अध्यात्मिक सोहळा होणार आहे.श्री.दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग होणार असुन





यज्ञाचार्य: पूज्यनीय पं. राजराजेश्वर दीक्षित (ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग पुजारी, म.प्र.) हे असणार आहेत. 'परमाराध्य' परमधर्माधीश उत्तरामनाय ज्योतीष्पीठाधीश्वर जगद्गुरू शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती '१००८' (ज्योतिर्मठ, बद्रिनाथ, उत्तरांचल) यांच्या शुभहस्ते प्राणप्रतिष्ठा सोहळा तर कलशारोहण सोहळ्याला प.पू. महामंडलेश्वर स्वामी देवेंद्रानंदगिरी (अध्यक्षः वेदांत आश्रम, बहादूरगड, उपाध्यक्षः अखिल भारतीय संत्र समिती), ह.भ.प. मारोतीबाबा कुरेकर (माजी अध्यक्ष जोग महाराज वारकरी शिक्षम संस्था, आळंदी),प.पू. वेदांताचार्य विद्यावाचस्पती डॉ. माणिकशास्त्री मुखेकर (वाराणसी, आळंदी) उपस्थित राहणार आहेत.या सोहळ्यास ना. धनंजय मुंडे, आ. पंकजाताई मुंडे,राहुल भैय्या कराड साहेब (मा. कार्यकारी अध्यक्ष माईर्स एमआयटी पुणे) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे तसेच भागवतराव कराड (माजी केंद्रीय अर्थ राजयमंत्री), मा. आ.चंद्रकांत सोनवणे (चोपडा, जळगांव ), संजय दौड माजी विधान परिषद सदस्य,बुधाजी पानसरे उद्योजक, नाशिक यांच प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या संपूर्ण सोहळ्यास विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथराव कराड (संस्थापक- अध्यक्ष, माईर्स एम. आय. टी., पुणे) यांची प्रेरणा असुन ह.भ.प.डॉ. नामदेवशास्त्री सानप महाराज (श्री क्षेत्र भगवानगड) हे आशिर्वादपर सदिच्छा भेट देणार आहेत. न.प.गटनेते वाल्मिक अण्णा कराड यांचे या सोहळ्यास विशेष सहकार्य लाभणार आहे. व्यवस्थापक समस्त ग्रामस्थ मंडळी, सारडगांव, नंदनज हे आहेत.

**चार दिवसीय कीर्तन महोत्सव...**

या सोहळ्यात चार दिवसीय कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला असुन महाराष्ट्रातील ख्यातनाम व जेष्ठ श्रेष्ठ किर्तनकार किर्तनसेवा करणार आहेत. यामध्ये व्याकरणाचार्य: ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, महंत ह.भ.प. राधाताई सानप (आईसाहेब) (श्री क्षेत्र मीराबाई संस्थान, पाटोदा),ह.भ.प. बापूसाहेब मोरे महाराज (जगद्गुरू तुकोबारायांचे वंशज - श्री क्षेत्र पंढरपूर) तर काल्याचे कीर्तन विद्यावाचस्पती ह.भ.प. डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज (नंदनज, ह. मु. नाशिक) यांचे होणार आहे. या महोत्सवात वारकरी संप्रदायातील गुणवान किर्तनकार, प्रवचनकार, गायक, वादक, भजनी मंडळी आदी आवर्जून उपस्थित राहणार आहेत.सोमवार, दि. २ डिसेंबर ते गुरुवार, दि. ५ डिसेंबर २०२४ प्रणप्रतिष्ठा सोहळा व दत्तयाग विधी,भजन, कीर्तन ,श्री.दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग व कीर्तन महोत्सव सोहळ्याचा व अध्यात्मिक पर्वणीचा भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प. विद्यावाचस्पती डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज (निर्माणकर्ते श्री. दत्तधाम, अध्यामिक उन्नती केंद्र) यांनी केले आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077